महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । रविवार, २८ जुलै २०२४

# सिडकोची ५ हजार अतिक्रमणांवर कारवाई

- गेल्या तीन वर्षांत सिडको, नैना क्षेत्रात धडक मोहिमा
- १३५ आरोपींवर ४८ गुन्हे दाखल

**म. टा. वृत्तसेवा,** नवी मुंबई

गेल्या तीन वर्षांत सिडको व नैना क्षेत्रातील तब्बल पाच हजारांहून अधिक अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे सिडकोकडून निष्कासित करण्यात आली आहेत. तसेच, सिडको क्षेत्रात बेकायदा राडारोडा टाकणे, माती चोरून अवैध वाहतूक केल्याप्रकरणी विविध पोलिस ठाण्यांत ४८ गुन्हे दाखल करण्यासह १२४ वाहनांवर जप्तीची कारवाई करण्यात आल्याची माहिती सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी दिली.

कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून जानेवारी २०२० ते जून २०२४ या कालावधीमध्ये अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात एकूण ९६८ निष्कासन मोहिमा राबविण्यात आल्या. निष्कासन कारवाई करण्यापूर्वी अनधिकृत बांधकामधारकांना (अतिक्रमणधारकांना) एमआरटीपी कायद्याअंतर्गत ३५८१ नोटिसा बजावल्यानंतर संबंधितांचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे.

अतिक्रमणांविरोधात सिडकोने राबविलेल्या मोहिमेअंतर्गत एकूण २५८ आरसीसी बांधकामे, ६४० वीट बांधकामे, ४,५८७ तात्पुरत्या स्वरूपाची अतिक्रमणे, झोपड्यांचे तोडकाम करण्यात आले. याशिवाय, घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेनंतर सिडको क्षेत्रात अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या २४४ होर्डिंग आणि परवानगीविना उभारण्यात आलेल्या व वायू प्रदूषण करणाऱ्या १५ क्रशर प्रकल्पावरही निष्कासनाची कारवाई करण्यात आल्याचे मेंगडे यांनी सांगितले. सिडकोच्या भूखंडांवर अवैधरीत्या राडारोडा टाकल्याप्रकरणी एकूण ४५ व माती चोरून अवैध वाहतूक केल्याप्रकरणी ३ अशा एकूण १३५ आरोपींवर एकूण ४८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### मोहीम तीव्र करणार

नवी मुंबईची अनिर्बंध वाढ रोखणे हे सिडकोचे प्रमुख कर्तव्य आहे. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सिडकोने नेहमीच कठोर पावले उचलली आहेत. त्याअंतर्गतच सध्या सिडकोतर्फे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई सुरू असल्याचे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सांगितले. भविष्यात अनधिकृत बांधकामांविरोधातील मोहीम अधिक तीव्र करणार असल्याचे ते म्हणाले.



### आठवडे बाजारांवरही बडगा

सिडकोच्या दक्षिण क्षेत्रात वसलेल्या करंजाडे नोड, उलवे नोड येथील पदपथ, रस्ते, सिडकोच्या मोकळ्या भूखंडावर आठवडे बाजार भरून अवैधरीत्या व्यवसाय करणाऱ्यांवरही सिडकोच्या अतिक्रमणविरोधी विभागाकडून कारवाई केली जात आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

सकाळ मुंबई, सोमवार, २९ जुलै २०२४

# पाच हजार बांधकामांवर नवी मुंबईत कारवाई

## सिडकोकडून चार वर्षांत गुन्हे दाखल

नवी मुंबई, ता. २८ (वार्ताहर) : सिडकोच्या वतीने २०२१ ते २०२४ या चार वर्षांमध्ये नवी मुंबई आणि नैना क्षेत्रातील पाच हजारांहून अधिक अनधिकृत बांधकामांवर कारवाई करून ती पाडण्यात आली आहेत. यात अनधिकृत बांधकामांसह अतिक्रमणे, होर्डिंग, क्रशर, डेब्रिज, माती चोरीचा समावेश असून अनधिकृतरीत्या डेब्रिज टाकणारे, माती चोरी व अवैध माती वाहतूक केल्याप्रकरणी ४८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच १२४ वाहनांवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

सिडकोच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने जानेवारी २०२० ते जून २०२४ या कालावधीमध्ये कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात एकूण ९६८ मोहिमा राबविण्यात आल्या. कारवाई करण्यापूर्वी अनधिकृत बांधकाधारकांना व अतिक्रमणधारकांना एमआरटीपीअंतर्गत नोटीसा बजावून बांधकाम पाडण्याबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानंतर धडक मोहिमेद्वारे या अनधिकृत बांधकामावर तसेच अतिक्रमणावर कारवाई करण्यात आली. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पार पाडली जात आहे. गेल्या चार वर्षांत सिडकोने आपल्या हद्दीत केलेल्या कारवायामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत. बेकायदा बांधकामे, झोपडपट्ट्या तसेच सिडकोच्या जागेत बांधकामांचे डेब्रिज टाकणाऱ्यांवर सिडकोने वेळोवेळी कारवाई करून वाहने जप्त केली आहेत. ही कारवाई अशीच सुरू राहणार असल्याचे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### केलेल्या कारवाया

| | |
|---|---|
| आरसीसी बांधकामे | २५८ |
| वीट बांधकामे | ६४० |
| तात्पुरती अतिक्रमणे व झोपड्या | ४,५८७ |
| होर्डिंग | २४४ |
| क्रशर | १५ |

### इतर गुन्हे

सिडकोच्या भूखंडांवर अवैधरीत्या डेब्रिज टाकणाऱ्यांच्या विरोधात ४५ गुन्हे, माती चोरी, अवैध माती वाहतूक केल्याप्रकरणी ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत १२४ डंपर, ट्रक, पोकलेन, जेसीबी, डोझर जप्त करण्यात आले आहे.

नवी मुंबई एक सुनियोजित शहर असून या शहराची अनिर्बंध वाढ रोखणे हे सिडकोचे प्रमुख कर्तव्य आहे. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सिडकोने नेहमीच कठोर पावले उचलली आहेत. त्याअंतर्गत सध्या सिडकोतर्फे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरू आहे.
- विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in